**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि.७ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील `मनस्वीनी` या महिला समुहातर्फे उद्या शुक्रवार, दि.८ मार्च रोजी रायपूर (छत्तीसगड) येथील श्रीमती शताब्दी पांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील राहणार आहेत. या व्याख्यानानंतर मनस्वीनीच्या महिला सदस्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम देखील होणार आहे.

---

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ७ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेअंतर्गत असलेल्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शनिवार, दि. ९ मार्च रोजी `स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडणूका आणि बदलते प्रवाह` या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभागृहात होणाऱ्या चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ.प्रकाश पवार यांचे बीजभाषण होणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.पी.डी.देवरे उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशाळेच्या संचालक डॉ.अर्चना देगावकर व समन्वयक प्रा.उमेश गोगडिया यांनी केले आहे.

---

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.७ (          ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत शनिवार दि.९ मार्च रोजी `प्रोसेस् इंटेन्सिफिकेशन इन केमिकल, फुड ॲण्ड अलाईड् इंडस्ट्रिज` या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी सकाळी १० वाजता आय.आय.टी. खरगपूर येथील डॉ.टी.के.गोस्वामी यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन होणार असून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर अध्यक्षस्थानी राहणार असल्याची माहिती समन्वयक डॉ.व्ही.आर.पराते यांनी दिली.

---

**बातमी क्र. ४**

जळगाव दि. ७ (         ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागात एम. एड अभ्यासक्रमाच्या ५० जागांकरीता ३१ मे रोजी शासनाची सामायिक परीक्षा होणार असून त्यासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. २६ मार्च ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे.

..२..

एम. एड. प्रवेश इच्छूक जे विद्यार्थी बी.एड्. उत्तीर्ण वा ॲपिअर किंवा पदवीसह डी.टी.एड. उत्तीर्ण असतील असे विद्यार्थी ही (सी.ई.टी.) देण्यास पात्र आहे. प्रवेश इच्छूक उमेदवाराने सामाईक प्रवेश परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरावयाचे असून माहितीपुस्तिका, अर्ज व प्रवेश प्रक्रियेचे विहित शुल्क भरण्याची प्रक्रिया ही दि. २६ फेब्रुवारी, २०१९ पासून http://www.mahacet.org/cetcell or http://mahacet.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सी. ई. टी अर्ज भरण्याची अंतिम दिनांक २६ मार्च २०१९ हा आहे.

कबचौ उमवितील शिक्षणशास्त्र विभागाची एम. एड. प्रवेश प्रक्रिया ही सदरील राज्यस्तरीय एम. एड. प्रवेश प्रक्रियेमार्फतच राबविली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी एम. एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सी.ई. टी. देणे अनिवार्य आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सी.ई.टी. परीक्षेचे ऑनलाईन अर्ज शिक्षणशास्त्र विभागात मोफत भरुन दिले जातील तसेच या संदर्भात मार्गदर्शन वर्गाचे आयोजनही विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात करण्यात येणार आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विभागात प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा डॉ. मनिषा इंदाणी दुरध्वनी क्र.०२५७-२२५८४३१, २२५७४३७/९४२१५४२०३६ किंवा डॉ. संतोष खिराडे मो.नं. ९९६०७७२६०४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ६ मार्च, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी